# प्रेस नोट

## मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्या चोरी करणाऱ्या परप्रांतीय टोळीस हडपसर पोलीसांकडुन अटक

पुणे शहरातील गंभीर गुन्हयांना प्रतिबंध करुन, गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. रविंद्र सेनगावकर, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे, यांचे सुचनांनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे व पोलीस निरीक्षक हेमराज कुंभार, यांनी हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत विशेष मोहिम राबविण्यात आली होती.

हडपसर पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील पोलीस अधिकारी मंगेश भांगे व पोलीस कर्मचारी नितीन मुंढे यांना पेट्रोलिंग दरम्यान मिळालेल्या गोपनीय बातमीनुसार हडपसर पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील इतर अधिकारी व कर्मचारी यांनी फुरसुंगी ओव्हर ब्रिज जवळ फुरसुंगी पुणे या ठिकाणी सापळा लावुन संशयितरित्या फिरणारे इसम नामे १) जुल्फेकार इब्रार खान वय २५ वर्षे रा.बाबुराव निवृत्ती होळकर यांचेकडे भाडयाने, होळकरवाडी, ता.हवेली जि.पुणे, मुळपत्ता- बुधरा पोस्ट,गाव डिनाडी ,ता. तुलसीपुर, जिल्हा बल्लामपुर, राज्य उत्तरप्रदेश २) समशादखान इरफान जहीर खान, वय १९ वर्षे, रा. मुळपत्ता- सोहनपुर पोस्ट, गाव दुधगावा, ता. तुलसीपुर, जिल्हा बल्लामपुर राज्य उत्तरप्रदेश ३) रहेमतुल्लाह बरकतउल्लाह खान, वय २२ वर्षे रा. मुळपत्ता- पोस्ट कोयलाबासरोड पोस्ट, ता.तुलसीपुर, जिल्हा बल्लामपुर राज्य उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेवुन सखोल चौकशी केली असता त्यांनी पुणे शहर, पिंपरी चिंचवड व पुणे ग्रामीण हददीत मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्या चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली.

**अटक आरोपी यांचेकडून वेगवेगळया कंपन्यांचे मोबाईल टॉवरच्या एकुण ६६ बॅटऱ्या, एक टेम्पो, एक इंडिका गाडी असा एकुण १०,६२,०००/- रुपयेचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.**

अटक आरोपी यांनी रात्रीचे वेळेस पुणे शहरातुन व पुणे शहरालगत असलेल्या गावांपासुन दूर असलेल्या मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्या चोरी केल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे.

**अटक आरोपींकडुन हडपसर, लोणी काळभोर, जेजुरी, बारामती, पौड, हिंजवडी, तळेगाव पोलीस स्टेशन कडील मोबाईल टॉवरच्या बॅटऱ्या चोरीचे खालील नमूद गुन्हे उघडकीस आणुन खालील नमुद अधिकारी व कर्मचारी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.**

**१) हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ११७२/२०१८ भादविक ३७९, ३४**
**२) भारती विदयापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३४९/२०१८ भादविक ३७९**
**३) कोंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ५४९/२०१८ भादविक ३७९**
**४) हिंजवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.३२८/२०१८ भादविक ३७९**
**५) जेजुरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १३३/२०१८ भादविक ३७९**
**६) जेजुरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १९७/२०१८ भादविक ३७९**
**७) जेजुरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २१५/२०१८ भादविक ३७९**
**८) पौंड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १५७/२०१८ भादविक ३७९**
**९) पौंड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १८५/२०१८ भादविक ३७९**
**१०) पौंड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २६३/२०१८ भादविक ३७९**
**११) राजगड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १६४/२०१८ भादविक ३७९**
**१२) राजगड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १७८/२०१८ भादविक ३७९**

१३) बारामती पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३५७/२०१८ भादविक ३७९
१४) लोणी काळभोर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ७२२/२०१८ भादविक ३७९
१५) तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३०९/२०१८ भादविक ३७९
१६) खेड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २३२/२०१८ भादविक ३७९
१७) वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २३१/२०१८ भादविक ३७९
१८) घोडेगाव पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २३९/२०१८ भादविक ३७९

सदरची कामगिरी मा. रविंद्र सेनगावकर, अप्पर पोलीस आयुक्त सो।, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो।, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो।, हडपसर विभाग पुणे, सुचनांनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे व पोलीस निरीक्षक हेमराज कुंभार, सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पो.हवा. ५५६२ राजेश नवले, पो.ना.२८०० प्रताप गायकवाड, पो.ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो.ना. ६४८९ विनोद शिवले, पो.शि. ७३१७ नितीन मुंढे, पो.शि. ८६९२ अकबर शेख, पो.शि. ७६८४ नाळे यांनी केली आहे.

